# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१४
## (सकाळी ११.०० वाजता)

एक : **प्रश्नोत्तरे -**

(अ) **तारांकित प्रश्न.**

(ब) **सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

दोन : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

तीन : **लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बृन्हमुंबई महानगरपालिकेचे २८ हजार सफाई कामगार अनेक वर्षापासून जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये धोकादायक स्थितीत वास्तव्य करित असणे, सदर इमारतींचा पुर्नविकास करुन सर्व सफाई कामगारांना महानगरपालिकेच्या अर्थसंल्पीय तरतुदीतून निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याबाबतची आश्रय योजना फेब्रुवारी, २०१३ च्या अर्थसंकल्पाद्वारे घोषित होणे, सदरहू आश्रय योजनेतर्गंत नियोजन, तात्वीक आराखडा अद्यापही तयार नसणे, सन २०१३ च्या हिवाळी सत्रात सदरहू बाब लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित करण्यात आली असताना तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी सदरहू प्रस्ताव एक महिन्याच्या आत शासनाकडे पाठविण्याबाबत तसेच सफाई कामगारांच्याबाबतीत शासनाने चार एफएसआय देण्याबाबत जी कमिटमेंट केली आहे ती शासन निश्चित पुर्ण करील असे सभागृहात आश्वासन दिलेले असणे, अद्यापही याबाबतीत सबंधित व शासन यांच्याकडून कार्यवाही न होणे, सफाई कामगारांना तातडीने घरे बांधून देण्याची व त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामास आळा घालण्याच्या दृष्टीने साफसफाईचे आधुनिक उपक्रम राबविण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **डॉ. अपूर्व हिरे, जयवंतराव जाधव वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"आगामी सिंहस्थासाठी नाशिक येथे सुमारे ५० लाखाहून अधिक साधू, महंत आणि भाविक येण्याची शक्यता असणे, तरी गेल्या दोन वर्षापासून यांच्या

नियोजनाचेदृष्टीने प्रशासकीय पातळीवर नियोजन सुरु असणे, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे करण्यासाठी सिंहस्थ आराखड्याची एकुण रक्कम १ हजार ५० कोटी ६१ लाखाची असणे, कुंभमेळ्याला जेमतेम ५-६ महिन्याचा अवधी शेष असूनही अद्यापही कुंभमेळ्याची बरीच कामे प्रलंबित व अपूर्ण असणे, सिंहस्थाच्या सुरु असलेल्या कामांना निधीचा तुटवडा भासू लागला असल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास येणे, एलबीटीच्या उत्पन्नावर मर्यादा आल्याने महापालिकेस कामे पुर्ण करण्याबाबत निधीची आवश्यकता असल्याचे नवनियुक्त आयुक्तांनी जाहिर करणे, केंद्र सरकारच्या निधीबाबत अद्याप भूमिका स्पष्ट नसल्याचे जाहिर होणे, कुंभमेळ्याच्या कामाबाबत शासन स्तरावर कमालीची उदासिनता असणे, त्र्यंबकेश्वर येथेही सिंहस्थाची अनेक महत्वपुर्ण कामे अपुर्ण असणे, त्यामुळे जनतेत तीव्र नाराजीची भावना पसरणे, कुंभ पर्वास अवघ्या काही महिन्याचा कालावधी शेष असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची गरज, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **श्री.रामहरी रुपनवर,** श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"आय.टी.आय.च्या अभ्यासक्रमात सन २०१२-२०१३ मध्ये सहामाही पद्धत लागू करण्यात आली होती, केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या आय.टी.आय.संस्थांना सूचना देण्यात येवून आय.टी.आय. शैक्षणिक दर्जात आमुलाग्र बदल करण्यात आले, या अभ्यासक्रमाच्या नुकत्याच जाहिर झालेल्या निकालात महाराष्ट्रातून जवळपास ८० ते ८५ टक्के विद्यार्थी नापास झाल्याचे उघडकीस येणे, याबाबत डी.जी.ई.कडे चौकशी केल्यानंतर यंदा नकारात्मक गुण पद्धत अवलंबविल्याचे सांगण्यात येणे, यावेळी विद्यार्थ्यांना व शिक्षण संस्थांना कसलीही अपेक्षित पूर्वसूचना न देता नकारात्मक गुण पद्धत अवलंबिण्यात आल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होवून अनेक विद्यार्थ्यांना कंपन्यामध्ये प्रशिक्षण घेता न येणे, नियमाप्रमाणे एक वर्ष वाया जाणार असल्याने त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने याबाबींचा फेरविचार करून पेपरची मूळ गुणांकन पद्धतीने पुनर्तपासणी करावी अशी विद्यार्थ्यांकडून होत असलेली मागणी, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण (आय.टी.आय.) शिक्षणासाठी शासन कसलेही अनुदान न देता जाचक अटी लावणे व त्यांची सतत तपासणी होत असणे, यामुळे राज्यातील शासकीय व खाजगी आय.टी.आय. प्रशिक्षण संस्था बंद पडत असल्याचे आढळून येणे,

केंद्र सरकार व्यवसाय प्रशिक्षणात सुलभता निर्माण करीत असताना नकारात्मक गुणपद्धतीने व जाचक अटी लावणे अयोग्य असणे, त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात कामगार मिळणे कठीण होणे, शासनाने याबाबत तातडीने निर्णयात बदल करून मूळ गुण पद्धतीनुसार आय.टी.आय. चे निकाल पूर्वीप्रमाणेच सुरू करावेत व या प्रशिक्षण संस्थाबरोबर चर्चा करून त्यांचे प्रश्न सोडवून त्यांना प्रोत्साहन व अनुदान देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. सुनिल तटकरे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात दिघी पोर्ट ट्रस्ट हे मुंबई या रस्त्यात अवजड वाहनांची वाहतुक रात्रदिवस सुरु असणे, यामुळे ते रस्ते नादुरुस्त व वाहतुकीस अयोग्य झाले असून याठिकाणी बरेच अपघात होत असणे, या अपघातात अनेक व्यक्ती मृत्युमुखी पडणे, या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम दिघी पोर्ट ट्रस्टकडे असून त्यांनी प्रथम रस्ते दुरुस्तीची कामे न करता वाहतूक सुरु ठेवणे, पोर्ट ट्रस्टकडून रस्त्यांची कामे त्वरीत करुन घेणेबाबत तत्कालीन पालकमंत्र्यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे वारंवार विनंती करुन सुध्दा पोर्ट ट्रस्टनी रस्त्याची कामे न करता अवजड वाहनांची वाहतूक सुरू ठेवल्याने तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, यापुढे अपघात होवू नये म्हणून रस्त्यावरील अवजड वाहनांची वाहतूक थांबवून रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण करुन घेणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई शहरातील अंधेरी, ताडदेव व वडाळा या तिन्ही आरटीओंचे संगणकीकरण झाल्याने कामकाजात पारदर्शकता येऊन दलालीला चाप बसेल अशी अपेक्षा फोल ठरली असून या तिन्ही आरटीओ परिसरात दलालांची दुकाने आजही सुरुच असल्याने सर्वसामान्यांची डोकेदुखी कायम असल्याचे समोर येणे, अंधेरी आरटीओत तर दलालांच्या इशाऱ्यावरच आरटीओ कार्यालयांचे संगणकीकरण करण्यात आली असल्याची भावना सर्वसाधारण नागरिकांमध्ये होणे, संगणकीकरणामुळे कामकाजात वेग आला असला तरी कार्यालयात दलालांचा राबता असणे, तसेच वडाळा आरटीओत देखिल दलालीबाबत जास्त तक्रारी असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, दलालांमार्फत आरटीओ कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना नडण्यात येत असल्याने त्यांच्यात पसरलेला तीव्र

असंतोष, त्यामुळे या प्रकरणी तातडीने चौकशी करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, या संदर्भात शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर -**

## - मध्यंतर -

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**सहा : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस) -**

**खालील मंत्र्यांच्या संबंधीत विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-**

**(१) मुख्यमंत्री.**

**(२) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री.**

**(३) गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री.**

**(४) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.**

**(५) आदिवासी विकास मंत्री.**

**(६) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री.**

**सात : महाराष्ट्र विधानपरिषद नियम १५६ अन्वये मा.मुख्यमंत्र्यांचा ठराव -**

"संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्याप्रमाणे संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक, २०१४ द्वारे प्रस्तावित करण्यात यावयाच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३६८ च्या खंड (२) मधील परंतुकाच्या खंड (ख) च्या कक्षेत येणाऱ्या सुधारणांचे हे सभागृह अनुसमर्थन करीत आहे."

**Resolution by the Chief Minister under rule 156 of Maharashtra Legislative Council Rules :-**

"That this House ratifies the amendments to the Constitution of India falling within the purview of clause (b) of the proviso to clause (2) of article 368, proposed to be made by the Constitution (One Hundred and Twenty-first Amendment) Bill, 2014, as passed by the both the Houses of Parliament."

**आठ : शासकीय विधेयके :-**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

**(१) सन २०१४ चे वि.स.वि क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१४.**

**(२) सन २०१४ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१४.**

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"गेवराई (जिल्हा बीड) तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावात रानडुक्कर व हरीणांच्या उपद्रवामुळे लाखो रुपयांच्या पिकाचे नुकसान होणे, रानडुक्करांनी शेतकरी व महिलांवर हल्ला केल्यामुळे अनेक शेतकरी या हल्ल्यात जखमी होणे, रानडुक्करांच्या भितीपोटी मजूरांनी रोजंदारीवर जाणे बंद केल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ येणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी त्वरीत नुकसान भरपाईची मागणी करणे, प्रशासकीय दिरंगाई, जाचक अटींमुळे शासकीय मदत मिळण्यास होत असलेला विलंब यामुळे शेतकऱ्यांत पसरलेली शासन विरोधी लाट, याबाबत शासनाने करावयाची सत्वर कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"रायगड जिल्ह्यातील बहुतांशी भागात खाड्या लगत मोठ्या प्रमाणावर भातशेतीचे पीक घेतले जात असणे, गेल्या ४ ते ५ वर्षापासून भात पिकाखालील मोठ्या प्रमाणावर समुद्राचे खारेपाणी शिरल्याने बाधीत क्षेत्रात वाढ होणे, गेल्या अनेक वर्षापासून खाडी लगतच्या शेतीला संरक्षक खारभूमी योजना वेळीच कार्यान्वित होत नसल्याने भात पिकांखालील जमिनी नापीक होणे, याबाबत शासनाकडे अनेक वेळा विविध आयुधांमार्फत मागणी करुनही शासन या योजनांमध्ये जाणूनबुजून करीत असलेले दुर्लक्ष तसेच आवश्यक निधी उपलब्ध न करणे, त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये भितीचे व घबराटीचे वातावरण निर्माण होणे व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असणे, सालाबादप्रमाणे शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान होत असल्याने

परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होणे, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १२ डिसेंबर, २०१४.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.